पुणे, वर्ष २, अंक २ जानेवारी २०१२ ₹ ३०

# अर्थपूर्ण

व्यक्ती, समाज आणि देशाच्या परिपूर्ण विकासासाठी...

पैसा झाला मोठा!
गुंतवणूक विशेष

अजित अभ्यंकर
वासुदेव कुलकर्णी
सुहास सापटणेकर
संजय सोनवणी

**स्वाभिमानी, आनंदी, परिपूर्ण जीवनाचा करू स्वीकार; बेरोजगारी, गुन्हेगारी, भ्रष्टाचार, दहशतवादाला देऊ नकार**

## प्रश्न फक्त रुपयाच्या घसरणीचा नाही...



# भूमिका

# प्रश्न फक्त रुपयाच्या घसरणीचा नाही....



यमाजी मालकर
ymalkar@gmail.com

**प्रश्न केवळ रुपयाच्या घसरणीचा नसून आमचे आयुष्य कमी दर्जाचे आणि बकाल मानसिकतेचे करून घ्यायचे काय, हा आहे. याचा अर्थ आपला प्रवास आता तरी मूलभूत बदलांच्या दिशेने झाला पाहिजे. स्वतंत्र भारतातील जे धुरीण आज स्वतःच्या नावाचा डंका वाजवून घेत आहेत, त्यांनी या बकालीकरणाच्या पापाचेही उत्तरदायित्व मान्य केले पाहिजे आणि अतिशय खुल्या मनाने मूलभूत बदलांची कास धरली पाहिजे.**

रुपयाची घसरण रोखण्यासाठी भारतीय रिझर्व बँक करत असलेल्या उपाययोजनांची तुलना एका अर्थतज्ज्ञाने चक्क चीनच्या प्रसिद्ध महाकाय भिंतीशी केली आणि म्हटले की ती भिंतसुद्धा चीनवरील आक्रमणे रोखू शकली नाही, तसेच अशा उपायांनी रुपयाची घसरण रोखणे शक्य नाही. यापुढील काळातही रुपयावरील ताण कायम राहणार असल्याचा निष्कर्ष या तज्ज्ञाने काढला होता. रुपयाच्या घसरणीची चर्चा आपण करतो कारण एक तर ते आपल्या देशाचे चलन आहे. दुसरे म्हणजे रुपया घसरण्यामुळे आपल्या सर्वांच्या आयुष्यावर विपरीत परिणाम होत आहेत. त्यामुळे बराच काळ स्थिर असलेल्या रुपया जगाच्या बाजारात हलका का होत चालला याचा विचार केलाच पाहिजे.

जगाने विनिमयासाठी एकेकाळची आर्थिक महासत्ता असलेल्या अमेरिकेचा डॉलर स्वीकारला आणि सर्व चलनांची तुलना डॉलरशी होऊ लागली. आयात-निर्यात व्यापार आणि डॉलरचा साठा हे चलनाची किंमत ठरविणारे प्रमुख घटक होत. मात्र गेल्या काही वर्षांत जगात फुकट्यांची संख्या वाढत चालल्याने आणि त्यांनी चलनाचा सट्टा बाजार सुरू केल्याने तोही महत्त्वाचा घटक ठरू लागला आहे. आपल्या देशाकडे गेल्या दशकात ३०० अब्ज डॉलर इतके विक्रमी परकीय चलन होते आणि त्या वेळी रुपया स्थिर होता. पण हा साठा गेले काही महिने कमी कमी होत चालला आहे. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे आयात-निर्यात व्यापारातील वाढती (निर्यातीपेक्षा आयात जास्त) तूट. भारताला इंधनावर ३० टक्के इतके प्रचंड परकीय चलन खर्च करावे लागते. त्यापाठोपाठ तंत्रज्ञान तसेच देशात तयार न होणाऱ्या वस्तूंवर आणि सोने खरेदीसाठी परकीय चलन खर्च करावे लागते. जागतिकीकरणानंतर आपल्या देशाची संपत्ती वाढली हे खरेच आहे, मात्र संपत्ती वाढली तसे कर्जही वाढले. सध्या परकीय चलनाचा साठा ४२ अब्ज डॉलरपर्यंत खाली आला असून कर्ज मात्र १०१ अब्ज डॉलरवर पोचले आहे. भारतात मिळणारे भांडवल महागडे असल्याने (व्याज जास्त) मोठ्या खासगी कंपन्या परदेशी संस्थांकडून कर्ज घेत आहेत, त्याचाही परिणाम होतो आहे. गेल्या वर्षभरात रुपयाची किंमत १८.३ टक्क्यांनी घसरली आणि ही घसरण आशियात सर्वाधिक आहे. याचा अर्थ जागतिकीकरणात आमची पत वाढली की कमी झाली, असा संभ्रम निर्माण होऊ शकतो.

चालू खात्यावरील तूट कमी करणे, विदेशी भांडवलाचा आटलेला ओघ पुन्हा सुरू होईल, असे प्रयत्न करणे, भारतीय विकासाच्या घोडदौडीविषयी निर्माण झालेल्या शंकांचे निरसन करणे, चलनवाढ रोखणे, राजकीय स्थैर्य प्रस्थापित करणे आणि आर्थिक तुटीकडे गांभीर्याने पाहण्यास सुरुवात करणे, हे रुपयाची घसरण रोखण्याचे मार्ग आहेत, असे अर्थतज्ज्ञ मानतात आणि ते बरोबरही आहे, मात्र हा पारंपरिक मार्ग झाला.

असा काही पेचप्रसंग निर्माण




झाला की समूह एकमेकांकडे बोट दाखविण्यात आघाडीवर असतात. तीच चिखलफेक सध्या देशात सुरू आहे. इतक्या गंभीर प्रश्नाला सामोरे जाण्याची भारतासारख्या खंडप्राय देशाची हीच रीत असेल तर आपल्याला कोणी वाचवू शकणार नाही. देशात गेली काही दशके औद्योगिकीकरण होऊनही आयात निर्यातीमध्ये तूट निर्माण होते आहे, याचे कारण आपल्याला माहीत आहे. औद्योगिकीकरणाला आपण जोड दिली ती खासगी मोटारींची. खासगी मोटार ही प्रतिष्ठा तर झालीच पण आता ती गरजही होऊन बसली. त्यामुळे खासगी मोटारींमध्ये पेट्रोल, डिझेल जाळण्याचे प्रमाण प्रचंड वाढले. याच वेगाने रेल्वेचा आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा विकास केला असता तर देशाचे अब्जावधी रुपयांचे परकीय चलन वाचले असते. इंधनावरील खर्चात बचत करून शेती, शिक्षणासारख्या प्राधान्यक्रमांना भिडता आले असते.

या तुटीचे दुसरे कारण आहे सोन्याची लालसा. देशातील ९२ टक्के सोने आयात केले जाते. आज देशात १८ हजार टन सोने असून त्याची किंमत केल्यास ती एकूण देशांतर्गत उत्पादनाच्या निम्मी (४७ हजार, ५०० अब्ज रुपये) आहे, जगातील ११ टक्के सोने भारतात असून भारतीयांची ८ टक्के बचत सोन्यात आहे, याची आपल्याला लाज वाटली पाहिजे. एकीकडे आपण पायाभूत सुविधांसाठी पैसा नाही म्हणून गळे काढतो आणि दुसरीकडे परकीय चलनाचा साठा परदेशांच्या खिशात ओततो. देशात भांडवल महाग आहे म्हणून उद्योजक परदेशातून कर्ज घेतात. आम्ही आमच्या देशात इतके असुरक्षित वातावरण करून ठेवले आहे की केवळ किमतीमुळे सोन्यासारखा फारसा उपयोगी नसलेला धातू कुरवाळत लोकांना जगावे लागते. देशात जे तंत्रज्ञान उपलब्धच नाही, त्यासाठी परकीय चलन खर्च झालेले समजण्यासारखे आहे. मात्र इंधन आणि सोन्यासाठी खर्च होणारे डॉलर हे आपणच आपल्या पायावर धोंडा पाडून घेणे आहे.

मुद्दा असा आहे की देशातील एखाददुसऱ्या समूहानेच या प्रश्नांचा विचार करून हाती काहीच लागणार नाही. देशहितासाठीचे काही निर्णय आपल्यातले भेद विसरून घ्यायचे असतात, या प्रगल्भतेची आज गरज आहे. ब्रिटिशांनी ज्या गोष्टींना प्रतिष्ठा दिली, मात्र ज्या आज फेकून दिल्या पाहिजेत, त्या कुरवाळून १२१ कोटी लोकसंख्येचा देश पुढे जाऊ शकत नाही. विशेषतः ब्रिटिशांनी या देशाला लुटण्यासाठी सुरू केलेली गुंतागुंतीची करपद्धती, पुस्तकी शिक्षणपद्धती आणि प्रतिष्ठा मिळवून दिलेली बकाल पाश्चिमात्य जीवनशैली यातून आमचे आजचे प्रश्न जटिल झाले आहेत. १०००, ५०० आणि १०० रुपयांचे एकूण चलनातील प्रमाण ९० टक्क्यांवर गेल्यामुळे काळा पैसा दडवून ठेवण्याची आपण आयतीच सोय केली आहे. रोखीच्या व्यवहारांना मोकळे रान मिळाले आहे. आता तर प्रत्यक्ष युद्ध करण्याऐवजी अशा मोठ्या खोट्या नोटा छापून भारताची अर्थव्यवस्था नासवण्याची कट-कारस्थाने चीन, पाकिस्तान करत असल्याच्या बातम्या प्रसिद्ध होत आहेत. चलनाच्या पुरवठ्यातील ही विसंगती आणि त्या माध्यमातून देशात वाढत चाललेली अशांतता रुपयाला खालीच खेचणार, यात आश्चर्य ते काय?

प्रश्न केवळ रुपयाच्या घसरणीचा नसून आमचे आयुष्य कमी दर्जाचे आणि बकाल मानसिकतेचे करून घ्यायचे काय, हा आहे. याचा अर्थ आपला प्रवास आता तरी मूलभूत बदलांच्या दिशेने झाला पाहिजे. स्वतंत्र भारतातील जे धुरीण आज स्वतःच्या नावाचा डंका वाजवून घेत आहेत, त्यांनी या बकालीकरणाच्या पापाचेही उत्तरदायित्व मान्य केले पाहिजे आणि अतिशय खुल्या मनाने मूलभूत बदलांची कास धरली पाहिजे.